# मेट्रो 3 : पहिल्या ट्रेनच्या डब्यांचे चार्जिंग सुरू

## चाचणीची उलट गणना सुरू



**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सिप्झ या पहिल्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गिकेसाठी मुंबईत दाखल झालेल्या आठ डब्यांचे उच्च दाबाने चार्जिंग सुरू करण्यात आले असून ऑगस्ट महिनाअखेरीस मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने चाचण्या घेण्याबाबत शिक्कामोर्तब केले आहे. ऑगस्ट महिन्याच्या २८ तारखेनंतरच चाचण्या घेण्यात येणार असल्याने आता चाचणीसाठी काऊंटडाऊन सुरू झाले आहे.

मेट्रो ३ या भुयारी मेट्रोसाठी प्रोटाटाईप ट्रेनचे डबे श्रीसिटी येथून मुंबईत ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीलाच दाखल झाले आहेत. प्रत्येक ट्रेनचे चार्जिंग ही रोजची आणि कधीही न थांबणारी प्रक्रिया आहे. २५ केव्ही एसी इतक्या उच्च दाबाने ट्रेनचे डबे चार्ज केल्यानंतरच अनेक प्रणाली चाचण्या केल्या जाणार आहेत. त्यामध्ये वातानुकूलित यंत्र, संवाद प्रणालीचे अलार्म्स, विद्युत यंत्रणा इत्यादीचा समावेश आहे. या सर्व चाचण्या यशस्वी झाल्यानंतरच ट्रेनच्या डिझाइन सिद्ध करणाऱ्या पुढील चाचण्या घेण्यात येतात. आंध्र प्रदेशातील श्रीसिटीहून आलेल्या आठ डब्यांची बॅटरी चलित शंटरने यशस्वीपणे जोडणी केली आहे. ही जोडणी सारिपूत नगर, आरे येथे ट्रेन डिलिव्हरी आणि चाचणी ट्रॅकसाठी उभारलेल्या तात्पुरत्या सुविधेमध्ये करण्यात आली तसेच बॅटरी चलित शंटर ही मेट्रो कार डेपोसाठी करण्यात आलेली पहिली खरेदी ठरली आहे. आता तात्पुरत्या सुविधेपासून मरोळ मेट्रो स्थानकापर्यंतच्या ३ किमी लांबीच्या ट्रॅकवर ट्रेनच्या चाचण्या या महिनाअखेरीस करता येऊ शकतील, असे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसीएल)ने स्पष्ट केले आहे.